# मंजूर प्रकल्पांच्या निधीसाठी पाठपुरावा

## मंत्री उदय सामंत; विद्यापीठात आढावा बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मंजूर विविध प्रकल्पांसाठीचा निधी प्रदान करण्याविषयी शासन स्तरावर पाठपुरावा करू. विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी एक कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर नजीकच्या काळात तातडीने करण्यात येईल, अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रलंबित प्रश्नांच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण मंत्री सामंत यांनी बुधवारी सर्व संबंधित अधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठकीत घेतली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजीव जलोटा, उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने, तंत्रशिक्षण संचालक डॉ. अभय वाघ, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कोल्हापूर विभागीय सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील उपस्थित होते. मंत्री सामंत म्हणाले, विद्यापीठाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत संचालक, सहसंचालक यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून ते मार्गी लावण्याची भूमिका घ्यायला हवी. त्रुटी असल्यास त्यांची तातडीने पूर्तता करून ते सोडविण्यासाठी पाठपुरावा करा. प्रलंबित डीसीपीएस सानुग्रह अनुदानाबाबत प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले. प्रस्ताव प्राप्त होताच स्वतंत्र शासन निर्णय होईल. ई-सेवार्थच्या अनुषंगाने संचालकांमार्फत प्रकरणनिहाय माहिती सादर करावी, तो प्रश्नही मार्गी लावण्यात येईल.

उच्च शिक्षणमंत्र्यांनी शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतीबंध तातडीने सादर करण्याची सूचना बैठकीत केली. शिक्षकेतर पदांच्या आकृतीबंधानुसार प्राप्त शासन निर्णयातील वेतन श्रेणीतील त्रुटींबाबत आढावा घेऊन त्या दूर करण्याचे प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

# देसाई अध्यासनाच्या निधीची कार्यवाही करू

## विद्यापीठ आढावा बैठकीत मंत्री सामंत यांची सूचना

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी एक कोटीचा निधी वितरित करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर नजीकच्या काळात करण्यात येईल. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मंजूर विविध प्रकल्पांसाठीचा निधी प्रदान करण्याविषयी पाठपुरावा करू, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज दिली. शिवाजी विद्यापीठाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत आज त्यांनी ऑनलाईन बैठक घेतली.

मंत्री सामंत म्हणाले, ''शिवाजी विद्यापीठाचे छोटे मोठे सर्व प्रलंबित प्रश्न पूर्णतः सोडविले जावेत, अशी माझी भूमिका आहे. त्यासाठी शासकीय स्तरावर जे काही प्रलंबित प्रश्न असतील त्याबाबत संचालक, सहसंचालक यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून ते मार्गी लावण्याची भूमिका घ्यायला हवी. त्याचप्रमाणे विद्यापीठानेसुद्धा प्रश्नांबाबत काही त्रुटी असल्यास त्यांची तातडीने पूर्तता करून



ते सोडविण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करायला हवा. जेणे करून शासन स्तरावर प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल.

यावेळी शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध तातडीने सादर करण्याची सूचना केली. बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी तातडीने १ कोटी निधी द्यावा अशा सूचनाही त्यांनी केल्या.

बैठकीस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजीव जलोटा, उच्चशिक्षण संचालक डॉ. धनराज माने, तंत्रशिक्षण संचालक डॉ. अभय वाघ, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कोल्हापूर विभागाचे सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील उपस्थित होते.

# अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांनी विकल्पांची पडताळणी करावी

लोकमत न्यूज नेटवर्क



कोल्हापूर : अंतिम सत्राच्या ज्या विद्यार्थ्यांनी नव्याने ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडलेला आहे, अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची लिंक, लॉगीन आणि पासवर्ड त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल व ई मेलवर पाठविण्यात येणार आहे. त्यासह आज, गुरुवारी विद्यार्थ्यांनी निवडलेला विकल्प (ऑनलाईन अथवा ऑफलाईन) दर्शविणारी यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यामध्ये आपल्या नावासमोर निवडलेला विकल्प बरोबर आहे का, याची पडताळणी विद्यार्थ्यांनी करून घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्या प्रशासनाने बुधवारी केले आहे.

या परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वी ऑनलाईन पद्धतीने परीक्षेसाठी विकल्प निवडला होता. त्यांना सध्याची परिस्थिती विचारात घेऊन ऑनलाईन पद्धतीने परीक्षा द्यावयाची असेल तर विकल्प निवडण्याची संधी परीक्षा विभागामार्फत उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांनी गुरुवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत शिक्षण घेत असलेल्या अधिविभाग, महाविद्यालयात संपर्क साधून विकल्प बदलाचा पर्याय अधिविभाग अथवा महाविद्यालयाच्या लॉगीन सुविधेमधून सादर करावा. त्याचबरोबर परीक्षा देण्यासाठीचे पोर्टल आणि आनुषंगिक सूचना यांची माहिती आणि व्हिडीओ विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अडचण असल्यास संबंधित अधिविभाग, महाविद्यालयीन स्तरावरील समुपदेशक, शिक्षकांशी अथवा संबंधित परीक्षा विभागाशी संपर्क साधावा. विद्यार्थ्यांना कोणताही त्रास होऊ नये.

# अंतिम वर्षाच्या परीक्षा २७ पासून

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे पदवीच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांना मंगळवार, दि. २७ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली आहे. पावसामुळे वीजपुरवठा तसेच मोबाईल नेटवर्क इंटरनेट बिघाड होण्याची शक्यता गृहीत धरून दि. २१ ऑक्टोबरपासून होणाऱ्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. या अंतिम वर्षाच्या परीक्षा आता २७ ऑक्टोबरपासून घेण्यात येणार आहेत. परीक्षा एक तास वेळेच्या तसेच ५० गुणांसाठी होणार आहेत. बहुपर्यायी प्रश्नावली पद्धतीने या परीक्षा घेण्यात येणार आहेत. विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने होणार असून, त्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. ही नोंदणी करण्यासाठी गुरुवार, दि. २२ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुदत वाढवून देण्यात आली आहे.

# ई-मेल, मोबाईल नंबर अपडेट करा

- **विद्यापीठाचे आवाहन : आज अंतिम दिवस**

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील पदवी अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्यासाठी ढगाळ वातावरणामुळे नेटवर्क मिळत नाही. त्यामुळे बुधवार २१ रोजी होणाऱ्या परीक्षा रद्द करून २७ ऑक्टोबरपासून परीक्षा घेतल्या जाणार आहेत. परीक्षेला बसणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल नंबर, ईमेल आयडी अपडेट केला नसेल अशा विद्यार्थ्यांनी आज, गुरुवार (दि. २२) सायंकाळी ५ वाजेपर्यंत अपडेट करावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

विद्यार्थ्यांच्या पीआरएन नंबरनुसार मोबाईल नंबर, ई-मेल आयडी अपडेट करण्याची सुविधा अधिविभाग, महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठातील unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यापीठाच्या लिंकवर ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षा देणार याची नोंद करावी. मुदतीनंतर विद्यार्थ्यांनी अपडेट केलेली माहिती स्वीकारली जाणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आज पाच वाजेपर्यंत आपला मोबाईल नंबर व ईमेल आयडी अपडेट करावा, आपण कोणत्या माध्यमातून परीक्षा देणार आहात याची माहिती द्यावी.

परीक्षेला निवडलेला पर्याय आज प्रसिद्ध होणार आहे. कारण विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची लिंक, लॉगीन आणि पासवर्ड त्यांच्या नोंदणीकृत मोबाईल व ईमेलवर पाठविण्यात येणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी निवडलेला विकल्प (ऑनलाईन/ऑफलाईन) दर्शविणारी यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे.

# बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी कोटीचा निधी देणार

## –मंत्री उदय सामंत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या लोकनेते बाळासाहेब देसाई अध्यासनासाठी एक कोटी रुपयांचा निधी वितरित करण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर नजीकच्या काळात तातडीने करण्यात येईल. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त मंजूर केलेल्या विविध प्रकल्पांसाठीचा निधी प्रदान करण्याविषयी शासन स्तरावर पाठपुरावा करू, अशी ग्वाही राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या प्रलंबित प्रश्नांच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षणमंत्री सामंत यांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी विद्यापीठाच्या विविध प्रश्नांचा सविस्तर आढावा घेतला आणि ते मार्गी लावण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्याचे सर्वच संबंधित घटकांना निर्देश दिले.

मंत्री सामंत म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे छोटे-मोठे सर्व प्रलंबित प्रश्न पूर्णतः सोडविले जावेत, अशी माझी भूमिका आहे. त्यासाठी शासकीय स्तरावर जे काही प्रलंबित प्रश्न असतील, त्याबाबत संचालक,



सहसंचालक यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून ते मार्गी लावण्याची भूमिका घ्यायला हवी. त्याचप्रमाणे विद्यापीठानेसुद्धा आपल्या प्रश्नांबाबत काही त्रुटी असल्यास त्यांची तातडीने पूर्तता करून ते सोडविण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करायला हवा.

यावेळी मंत्री सामंत यांनी शिक्षक व शिक्षकेतर पदांचा आकृतिबंध तातडीने सादर करण्याची सूचना केली. शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षकेतर पदांच्या आकृतिबंधानुसार प्राप्त शासन निर्णयातील वेतनश्रेणीतील त्रुटींबाबत शासन स्तरावर आढावा घेऊन त्या दूर करण्याचे प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. त्याचप्रमाणे प्रलंबित डीसीपीएस सानुग्रह अनुदानाबाबत सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे निर्देश त्यांनी संचालकांना दिले आणि तो प्राप्त होताच यासंदर्भातील स्वतंत्र शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल, असे सांगितले. ई-सेवार्थच्या अनुषंगानेही विद्यापीठांनी संचालकांमार्फत प्रकरणनिहाय माहिती सादर करावी. तो प्रश्नही मार्गी लावण्यात येईल, असे सांगितले.

या बैठकीस शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजीव जलोटा, उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने, तंत्र शिक्षण संचालक डॉ. अभय वाघ, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कोल्हापूर विभागाचे0 सहसंचालक डॉ. अशोक उबाळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील उपस्थित होते.